## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०६ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळे अंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे गांधी सप्ताह निमित्त सामाजिकशास्त्रे प्रशाळा येथील सभागृहात आज दि. ६ ऑक्टोबर रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत सहभागी एकूण ३० स्पर्धकांनी सत्य आणि अहिंसा विचारांची प्रासंगिकता, गांधी विचारातील भारत, महात्मा गांधीचे अध्यात्म विषयक विचार आणि म. गांधी यांच्या विचाराचा वर्तमान समाजावरील प्रभाव या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

या वेळी वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, विचारधारा प्रशाळेचे संचालक डॉ. म. सु. पगारे, डॉ. अतुल बारेकर यांच्यासह प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. आर. आर. चव्हाण, डॉ. सुदर्शन भवरे आणि डॉ. गजानन देशमाने यांनी तर समन्वयक म्हणून प्रा. रोशन मावळे यांनी काम पहिले. तर प्रा. प्रतिभा गलवाडे यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा. प्रदीप गोफणे, प्रा. मोईन शेख, प्रा. मनोज इंगोले आणि प्रा. नेहा पाटील यांनी परिश्रम घेतले

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ०६ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे गांधी सप्ताह २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विद्यापीठाचे प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर येथे 'मजबुती का नाम महात्मा गांधी' या विषयावर एक दिवसीय गांधी विचार शिबिराचे दि. ४ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आलेले होते.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांच्यासह मंचावर प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. हर्षवर्धन जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. व्ही. एम. रोकडे, प्रताप तत्वज्ञान केंद्राचे प्र. संचालक एस. डी. ओसवाल आदी उपस्थित होते.

यावेळी प्रा. म.सु. पगारे अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, जगण्याच महत्त्वाच सूत्र म्हणजे संयम, महात्मा गांधींमध्ये असलेला संयम हेच त्यांचे शौर्य आहे. त्यामुळे फक्त त्यांच्या प्रतिमा लावून नाही तर आजच्या पिढीने गांधीचे विचार आत्मसात केले पाहिजे. महात्मा गांधीच्या विचारांचा जागर करून मजबुतीका नाम महात्मा गांधी असे विचार युवकांमध्ये पेरले गेले पाहिजे असे यावेळी ते म्हणाले..

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात, प्रास्ताविक गांधी सप्ताहाचे समन्वयक डॉ. मनोज इंगोले तर डॉ. व्ही. एम. रोकडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ६ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता